# कामविषयक नवमतवाद

—————:०:—————

( ई. आर्मां यांनी कांही आक्षेपांस दिलेलीं उत्तरें )

१९२९ सालीं ' समाजसत्तावाद व विवाह ' या नांवाची एक पुस्तिका प्रसिद्ध झाली, तीवरून असें दिसतें की सोव्हिएट् रशियांत यासंबंधी बराच मतभेद आहे. त्यांत मा र्क्स व एं गे ल्स यांचे उतारे दिले आहेत, पण हे लेखक आता जुने झाले आणि त्यांच्यानंतर कामविषयक कल्पनांत पुष्कळच प्रगति झाली आहे. बें को फे न् म्हणतात की विवाहसंस्था सध्याच्या एकेरी पद्धतीवर आली ती स्त्रियांमुळे आली यांत विशेष अर्थ दिसत नाही. कारण स्त्रियांवर पातिव्रत्य लादण्यांत पुरुषांचा उघड उघड फायदा होता. यामुळे पुरुषांना पाहिजे त्या कामाला उपयोगी पडणारा एक कायमचा नोकर मिळाला.

आर्थिक प्रश्न बाजूला ठेवल्यास स्त्रीपुरुषांचें प्रेम एकाच व्यक्तीवर असण्याला कांही कारणही नाही आणि तें नैसर्गिक नाही हें आपल्याला नेहमी दिसतें. पातिव्रत्य ज्या स्त्रिया इमानाने पाळतात, त्यांचेंही इतर कोणावर प्रेम नसतेंच असें नाही, त्या केवळ कर्तव्य म्हणून तें पाळतात. पुरुषांचे बाबतींत तर त्याचें कोणाला कांही वाटतही नाही. सध्या पुष्कळ स्त्रिया पुरुषावलंबी असल्यामुळे पुष्कळ लेखक या बाबतींत केवळ स्त्रियांच्या स्वातंत्र्यासंबंधी लिहितात, परंतु पुरुषांनाही पुरेसें स्वातंत्र्य नसतें.

समाजसत्ता अंमलांत आल्यास सर्व स्त्रियांना काम करून पोट भरावें लागेल आणि त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळेल, तेव्हा त्यांचेवर इतर बंधनें घालण्यांत काय फायदा आहे ? त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत कोणतेंच नुकसान नाही. एक पुरुष व एक स्त्री यांनी परस्परांवर हक्क चालवण्यांत समाजाची कोणत्याही प्रकारची उन्नति होत नाही. जगांतील सुख वाढवणें व दुःख कमी करणें, यापेक्षा कोणतेंही उच्च ध्येय असणें शक्य नाही. आम्ही

व्यक्तिवादी असें म्हणतों की आपलें सुख कशांत आहे हें ठरवण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीला आहे आणि जोंपर्यंत स्वतःचीं मतें दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न आम्ही करीत नाही, तोंपर्यंत आम्हाला कोणीही अडथळा करतां नये. संभोगाची सक्ती कोणावरही होतां नये आणि हल्लीच्या विवाहपद्धतींत ती होते. दोन माणसांची खुषी असेल तरच त्यांत सुख आहे, एरवी नाही. अर्थात् अशा सुखाकरता कांही व्यक्तींना संघ स्थापन करावासें वाटल्यास त्यांना तशी मोकळीक असावी. असें नसल्यास आर्थिक दृष्ट्या कितीहि स्वातंत्र्य असलें तरीहि गुलामगिरी नष्ट झाली नाही, आणि यांत्रिक प्रगतीमुळे जसजसा लोकांना जास्त वेळ मोकळा सांपडेल, तसतशी अशा संघांची जरूरी जास्त भासेल, कारण हाही एक करमणुकीचाच प्रकार आहे. करमणूक म्हणजे व्यायामाचे किंवा बुद्धीचेच खेळ असले पाहिजेत असें नाही. बेकारी नष्ट होवो, आर्थिक स्वातंत्र्य मिळो, हें सर्व ठीक आहे, पण तें मिळालें तरी इतर गरजांचे बाबतींतही स्वातंत्र्य मिळालें तरच तें खरें स्वातंत्र्य म्हणतां येईल. समाजसत्ता प्रस्थापित झाल्यावर देखील जर दोन माणसांच्या खाजगी संबंधाचा हल्लीच्या विवाहासारखाच अश्लील पुकारा करावा लागणार असेल, अमुकअमुक व्यक्तींचा शारीरिक संबंध होणार आहे अशी जाहिरात द्यावी लागणार असेल, तर तें स्वातंत्र्य कसलें ?

या बाबतींत कांही समाजसत्तावाद्यांचें म्हणणें असें असतें की अशा प्रकारचें स्वातंत्र्य मिळण्यास समाजघटनाच बदलली पाहिजे, तेथपर्यंत तें शक्य नाही. याचा अर्थ स्पष्ट असा होतो की सध्या यासंबंधी कांही न करता चालू व्यवस्था मान्य केली पाहिजे. हें आम्हास बिलकुल कबूल नाही. ज्यांना संभोगाचे अनिष्ट परिणाम टाळण्याइतकें शिक्षण मिळालेलें आहे, अशांना या बाबतींत स्वातंत्र्य घेतां येतें. जोडप्यापैकी अन्न मिळवणाऱ्या व्यक्तीने दुसरीवर कामविषयक बाबतींत ताबा सांगणें ही निवळ अरेरावी आहे. यामुळेच हल्लीचा विवाह म्हणजे वेश्यावृत्तीपेक्षाही हीन दर्जाचा आहे, कारण वेश्यावृत्ति उघड असते आणि विवाहांत ढोंग असतें. आणि स्त्रियांना समान दर्जा देण्याचा कांगाव कर-

णारांना तरी पैशाच्या जोरावर पत्नीच्या शरीरावर मालकी सांगण्याची लाज वाटली पाहिजे. आपला एखादा मित्र गरीब असेल तर त्याला आपण अशा तऱ्हेने वागवतों काय ? मित्र म्हटला म्हणजे त्याचा दर्जा आपल्याइतकाच समजला पाहिजे, मग तो गरीब असो की श्रीमंत असो. आणि समान दर्जाच्या लोकांवर हुकूमत चालवतां येत नाही आणि चालवणें रास्त नाही. शिष्ट समजलेले लोक देखील पत्नीच्या शरीरावर हक्क सांगतात ही गोष्ट वेगळी, ते करतात म्हणून तें रास्त होत नाही. जे असा हक्क सांगत नाहीत, असे पुष्कळ लोक माझ्या माहितींत आहेत आणि स्त्रियांवर पातिव्रत्य लादणारे लोक स्वतः एकपत्नीव्रत पाळतात असेंहि नाही. कांही पुढारलेले लेखक विवाहाला औषध म्हणून एकाच्या मागणीनेंही घटस्फोट द्यावा असें म्हणतात. परंतु हेंही वाटतें तितकें समाधानकारक नाही, कारण एकाच्या इच्छेने घटस्फोट झाल्यास दुसऱ्याला दुःख झालेंच पाहिजे. आणि तें कां व्हावें ? जेव्हा सर्वांना पूर्ण कामस्वातंत्र्य असेल तेव्हाच अशा घटस्फोटाने एकाचें नुकसान होणार नाही, कारण मग इतरांशीं संबंध जोडणें फारसें कठिण होणार नाही.

*　　*　　*　　*

पुढील विचार माझ्या एका डाक्टर मित्राचे आहेत. माझ्याबरोबर बराच वाद केल्यानंतर त्यांनी ते लिहिलेले आहेत. ते म्हणतातः—

१. 'तुमच्या मनाला जें स्वतःचें वय वाटेल तेंच तुमचें वय.' हें तुमचें म्हणणें मानसशास्त्रांत जातें. माझा तो विषय नव्हे, तथापि मला त्याचे विरुद्ध कांही म्हणायचें नाही. इतर लोक म्हणतील तें वय कबूल करण्यास तुम्ही तयार नाही, हें ठीक आहे. तसेंच आपले एक मित्र म्हणतात की 'अमुक वयाचे पुढे संभोगसुख घेऊं नये हें मला कबूल नाही.' अर्थात् मी डाक्तरीचा धंदा किती दिवस करावा आणि केव्हा सोडून द्यावा, हें जसें माझें मीच ठरवावयाचें, तसेंच तें आहे. त्यांत दुसऱ्या कोणाला बोलण्याला वाव नाही.

२. असूयेविरुद्ध तुमची मोहीम मला सर्वथैव पसंत आहे. असूया हा एक

प्रकारचा उन्माद आहे. अशा उन्मादांत माणसांचे हातून गुन्हे होतात. आणि अशा लोकांना बांधून ठेवणें, थंड पाण्याचें स्नान, वगैरे उपाय केले पाहिजेत.

३. स्त्रियांना फुलांच्या किंवा कळयांच्या उपमा देणें हें काव्य आहे. मी डाक्टर आहें, औषधांची यादी लिहितांना मला काव्य सुचत नाही. मनुष्यप्राणि हा एक इंद्रियसमुच्चय आहे आणि त्या इंद्रियांचें कार्य योग्य रीतीने होणें याला आपण आरोग्य म्हणतों.

४. माझे मतें वयाचीं पहिलीं ५५–५६ वर्षे मनुष्य आपल्या एकंदर परिस्थितीशीं लढत असतो आणि या वयाला तो परिस्थितीवर जय मिळवून परि- पक्क होतो. यापुढील सात वर्षांत म्हणजे ५५–५६ पासून ६२ ६३ वर्षांपर्यंत मनुष्याला उत्तम संतति होण्याचा संभव असतो, कारण या वेळीं त्याचें रेत अत्यंत शुद्ध असतें.

५. माझ्या हातांत जर सत्ता असती तर मीं या वयांतील पुरुषांना प्रजोत्पत्तीकरता वेगळे काढून त्यांना जवळजवळ कच्चें मांस, पिठूळ पदार्थ व कच्च्या भाज्या खायला घालून उत्तम मद्यही दिलें असतें. अर्थात् उघड्या हवेंत व्यायामही करावयाला लावलें असतें. प्रजोत्पत्तीस योग्य अशा सुदृढ स्त्रियांस त्यांचेकडे पाठ- वलें असतें, आणि अशा तऱ्हेने पांचसहा पिढ्या प्रजोत्पत्ति झाल्यावर क्षयाने किंवा अशा इतर रोगांनी पीडिलेले रोगी हातांच्या बोटांवर मोजण्याइतके देखील सांपडले नसते अशी माझी खात्री आहे. प्रजोत्पत्तीसंबंधीं एखाद्या स्त्रीने मला सल्ला विचारल्यास मी तिला सरळ सांगतों की ५५ पासून ६४ पर्यंत वयाच्या एखाद्या सुदृढ पुरुषापासून संतति उत्तम होईल, मात्र त्याला कोणताही रोग किंवा रोगाचें शेंपूट असतां नये.

६. पॅरिस येथे मी वैद्यकीचा अभ्यास करित असतां जी इन्फ्लुएन्झाची साथ आली, त्यांत वृद्धांपेक्षा तरुण लोकच जास्त मेले. उघडच आहे. वृद्धांत स्वसंरक्षणशक्ति जास्त असल्यामुळेच ते वृद्ध झालेले असतात. मोठ्या वानरांत प्रजोत्पादनशक्ति मरेपर्यंत टिकते असें ' बोर्निओ ' येथील एका डॉक्टराच्या नज-

2895543

रेस आलें आहे. मनुष्यामध्ये मात्र सुधारणेच्या अनुषंगाने येणाऱ्या ज्ञानतंतूंच्या विकारांमुळे बऱ्याच लोकांस लवकर नपुंसकत्व येतें.

७. नपुंसकत्व याचा अर्थ काय करायचा हेंही पाहिलें पाहिजे. वारंवार समागम करण्याची शक्ति असणें आणि वीर्य शुद्ध असणें यांत अंतर आहे. ५५ चे पुढे एखाद्या सुदृढ मनुष्यालाही कदाचित् सहा महिन्यांतून एकदांच समागम शक्य होईल, पण त्याचीं मुलें सुदृढ होतील. संतति चांगली होण्यास समागमाचे वेळीं मनाला स्वस्थता पाहिजे. ज्यांचें विशेष प्रेम असतें अशा जोडप्यांत या स्वस्थतेऐवजीं फाजील उद्दीपन होण्याचाच संभव जास्त. तेव्हां प्रेमी जोडप्यांचीं मुलें चांगलीं होतील असा नियम नाही.

८. जेव्हा प्रजोत्पत्तीचा प्रश्नच नसून केवळ करमणुकीचाच प्रश्न असेल तेव्हां वयाचा प्रश्नच उद्भवत नाहीं. करमणूक पाहिजे त्याबरोबर करावी, मी त्याची गणना इतर कोणत्याही क्रीडेबरोबरच करतों. त्यांत मला फरक दिसत नाही.

९. कामविषयक बाबतींत काल्पनिक गुन्हे करणारे लोक कितीतरी असतात, आणि अशा कल्पनांनी त्यांचें नुकसान होत असतें. त्यांची भीति निराधार आहे अशी त्यांची समजूत घालून दिल्यास त्यांची प्रकृति सुधारते.

१०. ६३ वर्षांपुढच्याहि पुष्कळ लोकांना कामक्रीडेची प्रबल लालसा असते आणि आपल्यापेक्षा बऱ्याच तरुण अशा लोकांच्या सहवासाची जरूर भासते. प्रचलित समाजस्थितींत अशा पुरुषांना वेश्यांकडे जाण्याचा सल्ला मला नाइलाजाने द्यावा लागतो, आणि स्त्रियांना तर अशक्तता आणणारीं औषधें द्यावीं लागतात. या बाबतींत सर्वांस स्वातंत्र्य असल्यास असा प्रसंग येणार नाही

११. या बाबतींत कातडीच्या रंगावरून भेदभाव करण्याचें कारण नाहीं असें तुमच्यासारखेंच माझेंही मत आहे. त्याचप्रमाणे वयाचे मानानेही भेदभाव करण्याचें कारण नाही असेंही माझें मत आहे.

१२. वयाच्या ५५ पासून ६४ वर्षांपूर्वी, किंवा ६३ व्या वर्षांपूर्वी देखील कोणाच्याहि हातून महत्वाचें कार्य होत नाही. नवीन शोध किंवा पृथक्करणाचें काम कदाचित् पूर्वी होईल, परंतु समष्टिकरणाचें काम यापेक्षा कठिण असतें, ते पूर्ववयांत होत नाही.

या डाक्तराचें वरील मत पुष्कळांस चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे, परंतु १९३३ सालीं 'ब्रिटिश् असोसिएशन् ऑफ् सायंटिस्ट्स्' या संस्थेच्या सभेपुढे डॉ. डफ्टन् यांनी असें सांगितलें की बाप जितका जास्त वयाचा असेल त्या मानाने संतति अधिक बुद्धिवान् होते. बाप ४५ वर्षांचा असल्यास सामान्यापेक्षा दुप्पट बुद्धिवान, ६० वर्षांचा असल्यास १० पट आणि ७० वर्षांचा असल्यास ५० पट बुद्धिवान मुलें होतात, असें कोष्टक त्यांनी दिलें हें मत सदरहू डाक्तरांनी इंग्लंदांतील शाळांतील मुलांच्या आईबापांच्या वयासंबंधी चौकशी करून बनवले होतें. लॉंब्रोझो नांवाच्या लेखकानेंही आपल्या पुस्तकांत वृद्ध बापांच्या विद्वान मुलांची उदाहरणें दिलीं आहेत:—नेपोलिअन्, बाल्झाक्, बीकन्स्फील्ड्, वाल्पोल्, पिट्, शोपेनावर, वगैरे. अर्थात् तरीदेखील यासंबंधीं बराच मतभेद होण्याचा संभव आहे, परंतु इतकें मात्र खरें कीं बऱ्याच वयापर्यंत पुरुषांची कामवासना तीव्रतेने जागृत रहाते.

---

# दोन बापांचा मुलगा

पॅरिसमध्ये 'ल गॅल्वा' नांवाचा एक वकील होता. तो अत्यंत प्रामाणिक आणि सभ्य होता हें सर्वांस माहीत होतें, परंतु त्याच्याकडे खटले मात्र अशा प्रकारचे येत असत कीं त्यांची सुनावणी खासगी रीतीनेच करावी लागत असे. उदाहरणार्थ बळजबरीचा खटला असला की आरोपीचा वकील तोच असायचा. त्याला स्वतःला याची शरम वाटे, पण त्याचा इलाज नव्हता. लोक म्हणत शरम वाटते तर असे खटले घेऊं नयेत. बोलणें सोपें असतें पण करणें कठिण असतें.

# दोन बापांचा मुलगा

गरीब विद्यार्थी असतांना कसातरी वकिली पास झाल्यावर प्रथम अर्थातच धंदा चालणें कठिण होतें. त्यांतून त्याने आपल्यासारख्याच एका गरीब मुलीशीं लग्न केलें आणि मुलेंहि झालीं. तेव्हा भीक मागायचीच वेळ. अत्यंत धार्मिक आणि सरळ मनाचा मनुष्य. त्याने अशा वेळीं काय करावें ? या सुमाराला त्याच्याकडे एक भयंकर खटला आला. एका मनुष्याने, किंवा पशूने म्हणा पाहिजे तर, स्वतःच्या दोन मुलींवर बळजबरी करून नंतर त्याना वेश्यावृत्तींत घातलें होतें. खटला इतका गलिच्छ होता की तो घ्यायची त्याला लाज वाटली, पण करतो काय ? खायला कांही नव्हतें आणि त्यांत बरेच पैसे मिळणार होते. त्याने शेवटीं तो घेतला, त्यांत बरीच अक्कल लढवली आणि त्याचें नांव सर्वांच्या तोंडीं झालें. पण तेव्हापासून हें ठरल्यासारखेच झालें कीं त्याच्याकडे असेच खटले जायचे. इतर खटले त्याच्याकडे चुकून सुद्धा कोणी देईना. त्याच्याकडे गेलेला खटला अश्लील असलाच पाहिजे; नव्हे त्याची खासगी सुनावणीच व्हायची, हे सर्वांच्या डोक्यांत इतकें खिळलें की तो कोर्टात दिसला की लोक कोर्टातून निघून जायची तयारी करूं लागत तो स्वतः म्हणे की भंग्याचे काम सुद्धा यापेक्षा बरें !

त्याच्याकडे एकदा **दोन** बापांच्या मुलाचा खटला आला. मुलाला दोन बाप कसे असूं शकतील ? असें कदाचित् कोणाला वाटेल, पण तें कायद्यांत कठिण नाही. फ्रेंच कायद्याच्या दृष्टीने लग्न झाल्यावर १८० दिवसांचे नंतर, किंवा लग्न कोणत्याहि कारणाने मोडल्यावर ३०० दिवसांचे आंत, झालेलें मूल नवऱ्याचें समजतात. अर्थात् नवऱ्याने तें आपलें नव्हे असें सांगितल्यास व सिद्ध केल्यास गोष्ट वेगळी. यामुळेच घटस्फोट देतेवेळीं स्त्रीने दहा महिन्यांचे आंत पुनः लग्न करतां नये अशी अट कायद्याने घातली जाते. पण समजा एखाद्या स्त्रीने घटस्फोटानंतर दहा महिन्यांचे आंत लग्न केलें, तर तें कांही रद्द होत नाही, कारण कायद्यांत तसें सांगितलेलें नाही. यामुळे घटस्फोटानंतर ३०० दिवसांचे आंत आणि नवीन लग्नानंतर १८० दिवसांचे पुढे, स्त्रीला एखादें मूल होणें शक्य असतें आणि त्या मुलाचा बाप कोण हें अनिश्चित राहतें, कारण गरोदरपण दहा महिनेपर्यंतही चालूं शकतें किंवा सात महिन्यांचे आंतही संपू

शकत. हा केवळ तात्विक विचार नाही, अशा गोष्टी झालेल्या आहेत, आणि अशीच एक हकीकत वरील वकिलाकडे आली.

के रि ओ नांवाच्या मनुष्याची बायको घटस्फोट न घेत वेगळी झाली होती आणि तिने आणि आं री नांवाच्या गृहस्थाने नेपल्स शहरीं १८०७ सालीं एका नाटक कंपनींत नोकरी धरली आणि तीं नवराबायकोप्रमाणे राहूं लागलीं. १८१५ सालीं के रि ओ वारले आणि त्यानंतर थोड्याच महिन्यांत त्यांच्या बायकोला एक मूल झालें. नंतर तिने आं री शीं लग्न केलें, नंतर १८३६ सालीं आं री वारले, तेव्हा त्यांनी मृत्युपत्र करून आपली एक तृतीयांश मालमत्ता बायकोला व बाकीची मुलाला ठेवली. हा मुलगा जरी त्यांचे विवाहापूर्वी झाला होता, तरी त्यांनी तो आपला मुलगा अशीच त्याची नोंद केली होती. परंतु आता आं री यांची एक चुलत बहीण मधे पडली आणि तो मुलगा आईच्या पहिल्या नवऱ्याचा औरस पुत्र होता व ही नोंद करण्याचा हक्क आं री यांस नव्हता, अशा सबबीवर तें मृत्युपत्र खोटें ठरवण्याकरता तिने कोर्टाकडे अर्ज केला. फक्त अनौरस मुलाबद्दलच पाहिजे त्याला मी बाप आहें असें सांगून तशी नोंद करून घेतां येते, औरस मुलाबद्दल येत नाही. कोर्टाने तिचा अर्ज फेटळाला, कारण ज्याअर्थी कायद्याप्रमाणें के रि ओ किंवा आं री यांपैकी कोणीहि मुलाचा बाप असूं शकतो, त्याअर्थी तो कोण समजावा हें ठरवण्याचें काम जज्जांकडे येतें आणि के रि ओ हे बायकोपासून वेगळे राहूं लागल्याला मृत्यूचे वेळीं आठ वर्षं झालीं असल्यामुळे व ते बऱ्याच अंतरावर रहात असल्यामुळे, खरा बाप कोण हें कोर्टाचे मतें स्पष्ट होतें. बायको आं री जवळ रहात होती आणि त्यांनी तो आपलाच मुलगा असें सांगितलें, यावरून शंका घेण्यास बिलकुल जागा नव्हती.

या निकालावर बहिणीने अपील केलें वरिष्ठ कोर्टाने खालच्या कोर्टाचा निकाल फिरवला. त्यांचें म्हणणें असें की पहिला नवरा वारल्यापासून ३०० दिवसांच्या आंत झालेलें मूल त्याचेंच समजलें पाहिजे. इतर गोष्टींचा विचार करण्याचें कारण नाही.

## दोन बापांचा मुलगा

आतां मुलाच्या आईने त्यापेक्षा वरच्या कोर्टाकडे अपील केलें. कोर्टाने सर्वांत उच्च कायदेपंडितांचें मत घेऊन पुनः पहिल्या कोर्टाचा निकाल कायम केला. त्यांचें म्हणणें असें पडलें की कायदे: मुलांच्या हिताच्या दृष्टीने केलेले आहेत. फिर्यादीच्या बाजूचा निकाल होण्यास फिर्यादीनें असें सिद्ध केलें पाहिजे की (१) मुलगा आं री चा असणें शक्य नाही, आणि (२) तो के रि ओ चा असणें शक्य आहे. हीं दोन्हींहि विधानें हास्यास्पद आहेत, कारण के रि ओ ची बायको आं री जवळ रहात होती, के रि- ओ मेल्यानंतर २८४ दिवसांनी म्हणजे नऊ महिन्यांपेक्षा अधिक कालाने मुलगा जन्मला, आणि के रि ओ बायकोपासून ५०० मैलांवर रहात होते. एरवी जर मुलगा अनौरस ठरत असेल, तर ३०० दिवसांचा कायदा लावणें योग्य होईल, कारण त्याने मुलाचें हित होतें. पण जेव्हा कोणत्याही प्रकारची शंका असेल तेव्हां मुलाचें नुकसान होईल अशा तऱ्हेने कायदा लावतां नये.

हा खटला पांच वर्षे चालला होता आणि याबद्दल जिकडे तिकडे वाद माजून राहिला होता. कोणी म्हणत ज्याअर्थी दोन बाप शक्य आहेत, त्याअर्थी त्यांत निवड मुलानेच करावी; म्हणजे त्याने स्वतःचा फायदा किंवा आवड पहावी. कोणी म्हणत की अमुकच बाप आहे असें सिद्ध करणें शक्य नसल्यामुळे त्यांपैकी कोणीच बाप नाही असें ठरवावें, आणि कोणी म्हणत की मुलगा कोणासारखा आहे हें पाहून बाप ठरवावा. वस्तुतः आं री च्या कुटुंबांत मुलाला स्थान मिळालेलें होतें आणि इतक्या वर्षांनी त्याला पदच्युत केल्यास त्याचें भयंकर नुकसान झालें असतें. आणि कोर्टानेहि हाच विचार केला.

---

**मतप्रचाराच्या दृष्टीने कोणाही वर्गणीदारास मासिकाच्या प्रती इष्टमित्रांस फुकट वांटण्याची इच्छा असल्यास त्यांनी तसें कळवावें. प्रत्येकीं १० प्रती आमचे खर्चाने पाठवूं. कोणत्या प्रती पाठवणें हें आमच्या मर्जीवर राहील. —संपादक.**

# अस्सल-कमअस्सल

लेखक, श्री. या द व, कोल्हापूर.

हिंदु समाजांत ज्या अनेक घातक परंपरा आजतागायत प्रचलित आहेत, त्यांत 'अस्सल-कमअस्सल'चें खूळ चांगलेंच ठाण मांडून बसलें आहे व त्यामुळे समाजाचें अंतरंग दुबळें व कमकुवत बनलें आहे. हें पुष्कळांना माहीत असूनहि ते मूग गिळून स्वस्थ बसले आहेत, यामुळे समाजाचे एकीकरणास केवढी तरी मोठी खीळ बसली आहे. 'अस्सल-कमअस्सल' या शब्द प्रयोगास कायमचा अर्धचंद्र मिळेल तर समाजास खात्रीनें नवजीवन मिळाल्यावांचून रहाणार नाही.

या शब्दांचा रूढार्थ सर्वांस परिचित आहे. अस्सल म्हणजे पिढीजाद, वंशपरंपरागत संतति व कमअस्सल म्हणजे अनैतिक संबंधापासून झालेली अनौरस व वारसाहक्कास पात्र नसलेली संतति होय. अस्सल समजला जाणारा समाज अनैतिक संबंधापासून झालेल्या संततीला हीन लेखीत असतो आणि अस्सल व कमअस्सल यांमधे बेटीव्यवहार होत नसलेने व त्यांच्यांत उच्चनीचभाव कायमचा राहून गेल्यामुळें तिरस्कार, द्वेष व परकेपणा वाढून संघटनेला मोठा अडथळा उत्पन्न होतो.

यांत दोष कोणाचा ? व या दोन समाजांत परस्पर सलोखा व सोयरीक संबंध कसा घडवून आणतां येईल ? हे दोन महत्त्वाचे प्रश्न पुढें उभे राहतात. स्वच्छंदी, पागल व कामांध आईबापांच्या पोटीं निपजणारी निष्पाप व निष्कलंक अशी नैसर्गिक रीतीनें जन्मास येणारी संतति परमेश्वरी, नैसर्गिक कायद्याने गुन्हेगार, दोषी, पतित ठरत नाही. कविकुलगुरु कालिदास म्हणतात 'दैवायत्तं कुले जन्म। मदायत्तं तु पौरुषम्' (हें वाक्य भट्टनारायणाच्या 'वेणीसंहार' नाटकांतील आहे, कालिदासाचें नव्हे. सं.)

बेजबाबदार आईबापांची संतति जन्मतः हिणकस ठरत नाही. उलटपक्षी अस्सल व कमअस्सल समजल्या जाणाऱ्या संततीची निपज एकाच निसर्ग-नियमानें व कृतीने होत असल्यामुळें, एकास कुलीन व दुसऱ्यास कमअस्सल समजणें म्हणजे नैसर्गिक नियमाचें उल्लंघन नव्हे काय ? हें उल्लंघन सामाजिक व राष्ट्रीय दृष्ट्याही आपली राखरांगोळी करणारें असून मानवी जातीस कलंक फासणारें आहे आणि या भेदाभेदाबद्दल आपण परमेश्वराचे गुन्हेगार ठरणार नाही काय ? मात्र हा गुन्हा पीनल कोडांत येत नाहीं.

या उच्चनीचपणाबद्दल संतति रेसभरही जबाबदार नसून त्याचें मूळ प्रस्थापित समाजरचनेंतच आहे. एखाद्या झाडाचें फळ कडू लागलें तर त्याबद्दल त्याचे बियास जबाबदार न धरतां फळास दोष देणें हे जसें तर्कशुद्ध नाही, तसेंच अनौरस संततीस हीन लेखणें शहाणपणाचें नाही, जर कांही पाप झालें असेल तर तें नादान आईबापांचेंच होय.

कुल व शील हीं अगदीं भिन्न आहेत. शील म्हणजे चारित्र्य. एखादा कुलीन असला म्हणजे त्याला शीलसंपन्न समजायचा काय ? कुलीनांच्याच पाजीपणामुळे जी संतति निर्माण होते, तीच कमअस्सल समजली जाते, अशा कुलीनांस शील-संपन्न कसें म्हणतां येईल ? आज आपणांस चारित्र्यवान तरुण पाहिजे आहेत, केवळ कुलीन, बापजाद्यांची कीर्ति सांगणारे, शीलभ्रष्ट तरुण नको आहेत. अस्सल-कमअस्सल हा भेद बदफैली, नादान पण कुलीन आणि संभावित दरोडेखोरांनीं, कुचेष्टेशिवाय प्रतिष्ठा नाही, या न्यायानें, आत्मप्रौढी मिरवण्यासाठी निर्माण केला आहे. त्याचें महत्व देवाघरीं तर नाहीच नाही, व निसर्ग तर अशा गोष्टींना बिलकुल थारा देत नाहीं. ही आत्मप्रौढी मिरवणारे कुलीन बेरड, पतित संततीचे उत्पादक, बहुधा संपन्न असेच असतात, त्याखेरीज त्यांना अंगवस्त्रें ठेवून आपुक-मापुकाचे रंगेल खेळ खेळणें व त्यांतून पैदा होणाऱ्या संततीची तरतूद करणें शक्य होणार नाहीं. असे हे नरपशू प्रत्येक जातींत, प्रत्येक समाजांत, बिनदिक्कत संभावित मानभावीपणानें वागत असतात, इतर ढोंगी समाज त्यांना मानमरातब देतो,

त्यांच्याशीं रोटीबेटीव्यवहार करतो आणि त्यांचे अनौरस संततीसंबंधीं मात्र 'हा होय, अमक्याचे रखेलीचा आहे.' 'हा अमक्याचा लेकवळा (दासीपुत्र) आहे' असे हृदयभेदक वाग्बाण मारून तिला माणुसकीचे हक्कास सर्वथैव अपात्र समजतो. अशा कुलीन समाजास कोणती उपमा द्यावी हेंच कळत नाहीं. एकंरींत या बाबतींत हा नीतिबाज, ढोंगी समाज चोराला सोडून संन्याशाला निर्दयपणें फांशी देणेंचा अमानुष फैसला देत आहे. अशा तऱ्हेचे निकालावर अपील दाखल करून घेऊन योग्य निवाडा देणारें एकही सुप्रीम कोर्ट असूं नये काय? या अन्यायाचा प्रतिकार करतां येणार नाहीं असें म्हणणें म्हणजे मानवी बुद्धीचें दिवाळें वाजल्याची ग्वाही देण्यासारखेंच होणार नाहीं काय? पतित समाजावरील अन्यायाचें जोखड काढून टाकून त्यास समाजांत बरोबरीचें स्थान कसें प्राप्त होईल, याचा विचार करणें क्रमप्राप्त आहे.

पहिली गोष्ट अशी की ज्यांवर अन्याय होत आहे त्यांनीच आपलें दुःख वेशीवर टांगून त्याजबद्दल वाटणारी चीड लोकनिदर्शनास आणून देऊन त्याचे प्रतिकारार्थ शक्तिसर्वस्व खर्च करून आमूलाग्र क्रांती घडवून आणण्यासाठी भगीरथप्रयत्न केले पाहिजेत. 'सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील तयाचें' अशी चळवळ सुरू करणेची जबाबदारी अर्थातच त्या समाजांतील सुविद्य, कर्तव्यदक्ष अशा तरुण पिढीवर व विशेषतः कायदेपंडितांवर अधिक आहे. ढोंगी समाजाकडून प्रथमारंभीं सहानुभूति मिळणार नाही हें गृहीत धरून चाललें पाहिजे. प्रत्येक तरुणाने असें म्हटलें पाहिजे की मी पतित असणें शक्य नाही, कारण मीं कोणतेंही पाप केलेलें नाही. निसर्गनियमानेंच माझी उत्पत्ति होते, तेव्हा मला जर कोणी पतित म्हणेल तर त्यास मी आपला व आपल्या बांधवांचा दुष्मन् समजून जरूर त्या साधनांनी त्याचा प्रतिकार करीन. अशी प्रतिज्ञा प्रत्येकाने केल्यावर पतित ठरवलेल्या संततीस इतर समाजांत बरोबरीच्या नात्याने मानमान्यता, रोटीबेटीव्यवहार व औरस संततीचे सर्व कायदेशीर हक्क प्राप्त होऊन कृत्रिम भेद जेणेंकरून कायद्यानें नष्ट होतील असे निकडीचे प्रयत्न झाले पाहिजेत. 'बुकर् टी वॉशिंगटन्' सारखा एखादा महात्मा या

समाजाला केव्हां भेटेल तेव्हां भेटो. पण त्याची वाट पहात न बसतां वरील ध्येयानुसार काम करणारें एक ' कार्यकारी मंडळ ' स्थापून लवकर कामास सुरवात करावी. यासंबंधी पुढील सूचना विचारार्थ मांडीत आहे. १. ' पतित-समाजोद्धारक कार्यकारी मंडळ ' असें मंडळाचें नांव जाहीर करावें. २. त्याच्या सभासदांनी मित्रमंडळीशी या बाबतींत सतत विचारविनिमय करून त्यांच्या दृष्टिकोणांतील वैयर्थ्य त्यांच्या नजरेस युक्तिवादाने आणून द्यावें. ३. पतित समजल्या जाणाऱ्या समाजांतील विद्वान व निवडक लोकांची एक डायरेक्टरी (प्रथम महाराष्ट्रापुरती ) तयार करणेंत यावी व त्यांना या कार्याची माहिती देऊन सदस्य करून घ्यावें. ४. अशा सर्व सदस्यांचा एक पतितसमाजोद्धारक संघ स्थापण्यांत यावा. ५. कांही सहृदय, उच्च, कुलीन समजल्या जाणाऱ्या विद्वान लोकांची सहानुभूति संपादन करून त्यांस सभासद करून घ्यावें. ६. एक मासिक काढून जनतेपुढे तो विषय मांडून त्यांचा दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ७. या कार्यात अपेक्षित यश येईपर्यंत त्याची व्याप्ति महाराष्ट्रापुरती मर्यादित ठेवावी त्याचें महत्व दिसून येतांच प्रांतनिहाय संघ स्थापन होतील ८. या कार्याकरता अर्थातच पैशाची जरूर आहे, परंतु या समाजांत देखील पुष्कळ लोक श्रीमान आहेत, ते आपल्या समदुःखी बांधवांसाठी खात्रीने हवें तेवढें साहाय्य करतील. पण हें कार्यकारी मंडळाच्या प्रयत्नावर अवलंबून राहील. ९. अशा प्रकारें कार्यकारी मंडळ प्रभावशाली ठरल्यावर हिंदी कायदेमंडळाद्वारें ( या समाजापैकी कित्येक कायदेमंडळांचे सभासद नेहमी असतात ) ठराव मांडून पास करून घ्यावे. त्या ठरावांचें स्वरूप असें:-( १ ) जन्मास येणारें प्रत्येक मूल समान दर्जाचें व औरस समजण्यांत यावें, की जेणेंकरून त्यास वारसाचे सर्व हक्क औरस मुलांप्रमाणें मिळतील. ( २ ) अनीतीमुळे ज्यांचेकडून संतति निर्माण होईल अशा सर्व स्त्रीपुरुषांस समाजाचे महान गुन्हेगार समजून त्यांस काळे पाण्याची शिक्षा सुनावण्यांत येईल. ( ३ ) अशा सर्व आईबापांची मालमत्ता ( अर्थात् अनौरस समजल्या जाणाऱ्या संततीच्या हिश्शाची ) त्या संततीकरता जप्त करून नाझर कोर्टाचे वहिवाटीस द्यावी. ( ४ ) अशा संततीच्या आईबापांस



२

शिक्षा दिल्यानंतर अशा संततीची व्यवस्था ' गव्हर्मेंट् नर्सिंग होम ' मधून करण्यांत यावी व सज्ञान झालेवर जप्त केलेली मिळकत त्यांचे हवालीं करावी.

अशी व्यवस्था कायद्याने अंमलांत आल्याखेरीज बेजबाबदार स्त्रीपुरुषांस प्रतिबंध होणार नाहीं.

---

( केवळ आमची सहानुभूति दाखवण्याकरता या लेखास, थोडासा संक्षेप करून, स्थळ दिलें आहे. लेखकाने पुरेसा विचार केलेला नाही, आणि त्यांचीं सर्व मतें आम्हांस पसंत नाहीत. उदाहरणार्थ शेवटीं जे कायदे सुचविले आहेत, त्यांपैकी पहिल्याप्रमाणे अनौरस मुलांस औरस मुलांसारखेच हक्क दिल्यानंतर आईबापांस काळ्या पाण्यावर पाठवण्याचें काय कारण ? औरस आणि अनौरस हा भेदच नाहीसा झाल्यावर आईबापांवर सूड उगवण्याचें कारण दिसत नाही. लेखकाचा मुख्य मुद्दा मात्र बरोबर आहे. औरस आणि अनौरस हा भेद कायद्याने काढून टाकणें, म्हणजेच रशियाप्रमाणे विवाहित जोडपें आणि अविवाहित जोडपें यांत कायद्याने फरक न करणें, याचा अर्थ वस्तुतः विवाहसंस्था नाहीशी करणें असाच होतो. सं. )

---

# पोंच व अभिप्राय

जननाक्षमता, किंवा संततिनियमनाची शस्त्रक्रिया. लेखक, डॉ. रामचंद्र अनंत राईरकर, एम्. बी. बी. एस्. पृष्ठसंख्या १०३, क्राऊन अष्टपेजी, किंमत १२ आणे; प्रकाशक, चित्रशाळा प्रेस, पुणें.

पुस्तकांतील विषय नांवावरून स्पष्ट होत आहे, तथापि ' जननाक्षमता ' या शब्दाचा अर्थ केवळ वंध्यत्व असाच होतो आणि शस्त्रक्रिया अशा अर्थाने तो वापरणें बरोबर दिसत नाहीं. ' कृत्रिम वंध्यत्व ' हाच शब्दप्रयोग या ठिकाणी

योग्य दिसतो आणि तो फारसा जास्त लांब नाही. या शस्त्रक्रियेसंबंधी त्रोटक माहिती आम्ही आमच्या 'संततिनियमन' पुस्तकाच्या प्रथमावृत्तींत १९२३ सालींच दिलेली होती आणि ती स्वतः करून घेतल्याबद्दलहि मासिकांत एकदा प्रसिद्ध केलें होतें. तथापि ज्यांना त्याची सविस्तर माहिती पाहिजे असेल त्यांना ती या पुस्तकांत सांपडेल. पुस्तकांत बऱ्याच ठिकाणीं भाषेच्या व इतर दृष्टींनीही निष्काळजीपणा दिसतो, उदाहरणार्थ कोणत्याही बाबतींत शेंकडेवारी दिल्यास दिलेल्या आंकड्यांची बेरीज १०० व्हावी लागते, इकडे लक्ष दिलेलें नाही. कायद्याची दृष्टि सांगतांना ती असावी तितकी स्पष्ट केलेली नाही. वस्तुतः यासंबंधी स्पष्ट कायदा असा इंग्लंडांत व येथेही नाही आणि अशा प्रकारचा खटलाहि कोर्टांत गेलेला नाही. तथापि यासंबंधी डॉ. नॉर्मन् हेअर् यांस आम्हीं स्वतः विचारलें असतां त्यांचें मत असें पडलें कीं ही शस्त्रक्रिया सार्वजनिक इस्पितळांत, म्हणजे सार्वजनिक खर्चाने केल्यास कायदा आड येईल, परंतु रोग्याच्या इच्छेने व रोग्याच्या खर्चाने ती केल्यास कायद्याची हरकत नाही. अशा शस्त्रक्रिया सार्वजनिक खर्चाने हिंदुस्थानांत देखील झालेल्या आमचे माहितींत आहेत, परंतु यासंबंधी खटला झाल्यास काय होईल असा प्रश्न आहे. अर्थातच वेडगळ लोकांवर अशी शस्त्रक्रिया सक्तीने करणे झाल्यास मात्र त्याकरता वेगळा कायदाच करणं भाग आहे, कारण सामान्यतः रोग्याच्या संमतीशिवाय कोणतीही शस्त्रक्रिया करणें हा गुन्हा आहे. या शस्त्रक्रियेसंबंधी मुख्य अडचण म्हणजे पुरुषांस नपुंसकत्व येण्याची भीति वाटते, परंतु शेंकडो लोकांच्या अनुभवावरून ती निराधार ठरते. याच भीतीमुळे पुष्कळ पुरुष स्वतःवर शस्त्रक्रिया करून घेण्याऐवजी बायकोवर करवूं इच्छितात, परंतु त्रास, खर्च व कठिणाई या सर्व दृष्टींनी पुरुषांनाच हें अधिक सोयीचें आहे. अर्थात् याला दुसरी बाजू आहे. मुलें बायकांनाच होतात, तेव्हां पुरुषांवर शस्त्रक्रिया करून तीं कदाचित् बंद होणार नाहीत, हा एक प्रश्न; आणि एक बायको मरून दुसरी करावयाची वेळ आल्यास तिला मुलांची इच्छा असणें स्वाभाविक आहे आणि ती अशा नवऱ्याकडून पूर्ण होणार नाही, याचा विचार करणें जरूर आहे. हें केवळ काल्पनिक नाही, अशीं

उदाहरणें आम्हांस माहीत आहेत.

× × × ×

यासंबंधी खर्चाची अडचण पुष्कळांस भासते आणि मुंबईसारख्या ठिकाणी खर्च जास्त येतो. परंतु **वाई** येथील श्री. राजाराम जगन्नाथ बनारसवाले ( राजाभाऊ जोशी, ) कल्चर्ड मोत्यांचे व्यापारी, हे आम्हांस कळवतात की त्यांनी ही शस्त्रक्रिया स्वतः करून घेतली आहे, आणि ती थोडक्या खर्चांत करण्याची व्यवस्था ते करू शकतील. गरजूंनी त्यांचेकडे पत्रव्यवहार करावा.

---

# पत्रव्यवहार

## १.

१ 'स्वास्थ्या' च्या आगष्ट १९३४ चे अंकांतील पृष्ठ ३६ वरील 'कोणत्याहि गाष्टीच्या मुळापर्यंत जाण्याची लोकांना भीति वाटते आणि या भीतिमुळेच जातिभेद, उत्पन्न होतात आणि सामाजिक, धार्मिक व राजकीय तट पडतात.' या वाक्याचा अर्थ मला पूर्णांशाने समजत नाही. तरी सोदाहरण स्पष्टीकरण करा, अशी विनंति करतों. २. स्त्री ही पुरुषाच्या ध्येयमार्गांतील धोंड कीं उल्का? या वादाबद्दल आपलें निर्भीक मत काय आहे? आपला **ल. गो. शेळकंदे.**

उ. १. कोणत्याही गोष्टीचें कारण शोधून काढण्याच्या दृष्टीने मनुष्य पृथक्करण करूं लागला म्हणजे पुष्कळ वेडगळ समजुती आपोआप नाहिंशा होतात. उदाहरणार्थ हल्ली 'जवानी की हवा' नांवाच्या बोलपटांत एका पारशी स्त्रीने काम केल्यामुळे पारशांनी जी आरडाओरड केली, तिच्या मुळाशीं काय आहे? पारशांचें म्हणणें की सिनेमाचा धंदा हलकट आहे, किंवा निदान त्या धंद्यांत गेल्यास स्त्रियांची नीति बिघडते. या त्यांच्या म्हणण्यांत कितपत तथ्य आहे? या सिनेमा कंपनीच्या डायरेक्टरांपैकी चार पारशी आहेत, पैकी **सर फिरोज सेठना** असें म्हणाले की हें मला माहीत असतें तर मी विरुद्ध मत दिलें असतें.

म्हणजे जो धंदा हलकट किंवा अनीतीचा वाटतो तो इतरांनी करून त्यांतून आपण पैसे मिळवण्यास हरकत नाही. वेश्यांविरुद्ध ओरड करणाऱ्या लोकांनी स्वतःच एखादें वेश्यागृह चालवण्यापैकीच हा प्रकार आहे. बरें, इतर जातींच्या व धर्मांच्या स्त्रिया–आणि त्याही सभ्य कुटुंबांतील–बोलपटांत काम करीत आहेत, त्या सर्व बिघडल्या आहेत असें म्हणण्याचें धाष्टर्य पारशीहि करणार नाहीत. मग काय पारशी स्त्रियांची नीति इतरांपेक्षा अधिक लटपटीत आहे! हेंही पारशी कबूल करणार नाहीत. एवंच पारशांच्या म्हणण्याला कोणत्याही बाजूने आधार सांपडत नाही. आणि येथे नीतीची व्याख्या काय, याचाही विचार आपण केलेला नाही. तो प्रश्न सोडून दिला तरी पारशांना वास्तविक भीति वाटते ती अशी. सर्व पारशी स्त्रिया पारशी समाजाची मालमत्ता आहे अशी त्यांची समजूत असल्यामुळे त्यांचा परधर्मीयांशीं संबंध झाल्यास आपली मालमत्ता दुसऱ्याने चोरली असें त्यांना वाटतें. कारण पारशी स्त्रियांची नीति बिघडण्याचीच त्यांना भीति वाटते असें नाही, तर त्यांनी परधर्मीयांशीं लग्न केल्यास देखील ते ओरड करतातच. हें सर्व फक्त स्त्रियांस लागू असतें आणि पुरुषांना नसतें दारूचीं दुकानें बहुतेक पारशांचीं असतात, सिनेमाचे मालकही पारशी असतात आणि नटही असतात, पारशी पुरुषांनी युरोपीय बायका केल्या तरी चालतात याच्या मुळाशीं केवळ स्त्रियांसंबंधी अनुदारबुद्धि आहे, हें समंजस पारशांसही दिसतें. अशाच तऱ्हेने प्रत्येक विषयाची फोड करून पाहिल्यास पुष्कळ जुन्या समजुतींत केवळ दुराग्रहाशिवाय कांही दिसणार नाही. पण मनुष्य फोड करायला तयार नसतो कारण आपण करतों तेंच बरोबर असें त्याला वाटायला पाहिजे असतें आणि अरेरावीने बळकावलेले हक्क त्याला कायम ठेवायला पाहिजे असतात. उदाहरणार्थ ब्रिटिश लोकांचा हिंदुस्थानावर राज्य करण्याचा हक्क. त्याच्या मुळाशीं जायला त्यांची कधी तयारी असणार नाही आणि तेंच साहजिक आहे. तथापि तो इतरांनी कबूल केला पाहिजे असें नाही.

२. स्त्रियांत आणि धोंडेंत एक साम्य निर्विवाद आहे. कितीहि लाथा मारल्या तरी आणखी खायला धोंड जशी, नेहमी तयारच असते ( फुटली नाही तर )

त्याचप्रमाणे स्त्रियांचे पुरुषांनी कितीहि हाल केले तरी 'असे पति देवचि ललनांना' असें म्हणून त्यांतच आनंद मानायला, नव्हे पुरुषांचा पाय किती गोड लागतो, लाथा खाणें हें स्त्रीजातीला भूषणावह आहे, तसें केल्याने आपली सहनशीलता व्यक्त होते, स्त्रियांना स्वातंत्र्य बिलकुल उपयोगी नाही, पुरुष अन्नदाता आहे, त्याच्या ताब्यांत रहाणें हेंच स्त्रियांचें कर्तव्य आहे, वगैरे गोष्टी सांगायला देखील त्या तयार असतात. धोंड निदान अशा गोष्टी सांगत नाही, तेव्हा धोंडच थोडीशी श्रेष्ठ ठरेल. तथापि स्त्रियांना धोंड म्हणून बिचकणें हें पुरुषांना मात्र भूषणावह नाही. श्रीरामचंद्राप्रमाणे लाथ मारून नव्हे, तर शिक्षणद्वारा जर स्त्रियांचा उद्धार त्यांना करतां आला तरच त्यांत भूषण आहे. या स्त्रिया जर शिलांऐवजी मनुष्य झाल्या तर त्यांत पुरुषांचेंही नुकसान नाही, हें पोतदारांना ओळखत नाही असें दिसतें. त्यांना धोंड म्हणून बिचकणें हा भ्याडपणा आहे, त्यांना ज्ञान देऊन सजीव करणें हे सुज्ञांचें काम आहे. **सं.**

२

१. नपुंसकत्वावर आपण एखादा सविस्तर शास्त्रीय लेख लिहून अगर लिहवून प्रसिद्ध केल्यास वाचकवर्ग आपला फारच आभारी होईल. २. ना. जाधवांनी ' प्राचीन आर्यसंस्कृति ' या मागील लेखांत प्राचीन काळीं आपले पूर्वजांत बऱ्याच जवळच्या नात्यांतील लोकांत विवाह होत असत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यावर आपला संपूर्ण विश्वास आहे काय ? या काळांत ही मर्यादा कोणती असावी असें आपलें मत आहे ? ३. हिंदुस्थानांत व इतर राष्ट्रांत सध्यां अगदीं जवळच्या अशा कोणत्या नात्यामध्यें विवाह चालू आहेत ? ४. उच्चवर्णीय हिंदूंमध्येही कांहीं प्रांतांत ही मर्यादा मामाभाचीविवाहापर्यंत येऊन ठेपली आहे असें ऐकतों. हें खरें काय ! ५ असे मामाभाचीविवाह कोणत्या प्रांतांत, कोणत्या जातींत व किती प्रमाणांत होत आहेत ? **पीडी ३६५**

**उ.** १. नपुंसकत्वावर सविस्तर लेख नोव्हेंबर किंवा डिसेंबरचे अंकांत देऊं. २. भावाबहिणींच्या विवाहाची चाल ईजिप्तमधे निर्विवाद होती आणि रामायणाची

सर्व गोष्ट ईजिप्तवरून लिहिलेली आहे असें हल्ली बऱ्याच विद्वानांचें: मत बनत चाललें आहे. ना. जाधवांनी कांही पुरावेही दिले आहेत, आणि यांत मोठेंसें आश्चर्य मानण्यासारखें कांही नाही. ज्या चाली आपल्यांत नाहीत त्या आपणांस चमत्कारिक वाटणें साहजिक आहे, परंतु यावरून त्या पूर्वी कधी नव्हत्या असें मात्र नाही. ३. चुलत भावंडें किंवा आतेमामेभावंडें यांचीं लग्नें ख्रिस्ती देशांत होतात व कांही हिंदूंतही होतात ४. मामाभाचीचें निदान एक लग्न तरी ब्राह्मणांत झालेलें आमच्या पाहण्यांत आहे, तथापि ब्राह्मणांच्याही पोटजातींत यासंबंधी वेगवेगळ्या चाली असतात आणि तशी चाल ज्या जातींत असेल, तींतच तें कायदेशीर होईल, एरवी होणार नाही. ५. यासंबंधी आंकडे आमचेकडे नाहीत. **सं.**

---

# शारदाबाईस पत्र

स मा ज स्वा स्थ्या च्या जुलैच्या अंकांत आपलें जें पत्र प्रसिद्ध झालें आहे, त्यांत आपण आम्ही दोघांनी प्रो. पंडितांच्या 'सुधारक' नाटकावर ज्ञानप्रकाशमधे जी टीका केलेली होती, तिला उद्देशून बरेंच लिहिलें आहे. प्रथमच आपण म्हटलें आहे की या टीकेंत बरेंच तथ्य आहे व प्रो. पंडितांचें मत हास्यास्पद आहे, परंतु यानंतर आमच्या टीकेंतील मजकुराला उद्देशून आपण जे मुद्दे उपस्थित केले आहेत, ते वाचून, कांहीं ठिकाणीं आपला विनाकारण गैरसमज झाला आहे व कांही ठिकाणीं आपला तीव्र मतभेद आहे असें आम्हांस वाटतें. याकरतां आमची ( समतावाद्यांची ) भूमिका काय आहे, हें या बाबतींत जास्त स्पष्ट करण्याचें ठरवलें आहे.

प्रथमतःच आम्हांला एक गोष्ट सांगणें जरूर वाटतें, ती ही कीं, 'सुधारक' नाटकावरील टीकेंत आम्ही वेश्याव्यवसायाच्या उद्भवाविषयीं अगर तो नाहीसा करण्याच्या उपायाविषयीं फारशी चर्चा केली नाही. याचें कारण

मुख्यत: वेश्याव्यवसायावर लिहावयाचें नसून प्रो. पंडितांच्या मतांविषयीं आम्हांला टीका करावयाची होती व तदनुषंगाने वेश्याव्यवसायासारखा कोठलाहि सामाजिक प्रश्न असल्या अशास्त्रीय विचारसरणीने सोडवण्याचा प्रयत्न करणें किती हास्यास्पद ठरतें, हें दाखवावयाचें होतें. या टीकेतील अपूर्णत्वामुळेच कांही गैरसमज उत्पन्न झाले आहेत असें वाटतें. उदा., वेश्यावृत्तीप्रमाणेंच विवाहसंस्थाहि प्रचलित असमताप्रधान समाजाचा घटक आहे हें आम्हांस टाळता नाही, असें आपण गृहीत धरतां आहांत. त्याचप्रमाणें पारंपरिक नीति आम्हांला मान्य आहे अशी आपली समजूत झालेली दिसते. परंतु हीं दोन्ही विधानें अगदी चुकीचीं आहेत. वास्तविकपणें प्रचलित नीतिकल्पना व त्याचबरोबर सध्याच्या कालची विवाहसंस्था वगैरे, ह्यांसारख्या प्रतिगामी घटकांशीं अविरत युद्ध करून त्यांचा नायनाट करणें, ही गोष्ट समतावाद्यांच्या नित्य राजकीय व सामाजिक कार्यक्रमापैकीच आहे व त्या बाबतींत समतावाद्यांइतके परिश्रम आतांपर्यंत दुसऱ्या कोणीहि केलेले नाहींत व करीत नाही. प्रचलित समाजरचना पूर्णपणें मोडून खरी आर्थिक समता व खरें स्वातंत्र्य यांच्या पायावर पुनर्घटना करण्याचें ध्येय असलेल्या समतावाद्यांना प्रचलित नीतिकल्पना पाहिजे आहेत हें विधान अत्यंत धाडसाचें होईल......या बाबतींत 'किर्लोस्कर' मासिकाच्या मार्चच्या अंकांतील आमचा निबंध आपण पहावा अशी विनंति आहे.

वेश्यावृत्तीच्या उत्पत्तीविषयीं आपली काय मतें आहेत तें आम्हांला निश्चितपणें सांगतां येत नाहीं. आमच्या मतें वेश्याव्यवसायाचा उगम खासगी मालमत्तेबरोबरच झाला. प्रचीन पितृसत्ताक समाज स्थिर झाल्याबरोबर खाजगी मालमत्ता, लैंगिक सभ्यपणा ( प्यूरिटॅनिझम् ) व वेश्यावृत्ति या तीन सामाजिक घटकांचा उदय झाला व या तिहींच्या कोंदट व भीषण वातावरणांत लैंगिक सुख व प्रेम व त्याचप्रमाणें प्रेम व विवाह, यांचे संबंध तोडले गेले. लैंगिक भावना अपवित्र व संकटप्रद ठरवल्या, कारण त्यांनी जर नैसर्गिक स्वरूप धारण केले तर ताबडतोब मालमत्तेच्या भजनीं लागलेल्या मातापितरांचे सर्व बेत फिसकटायचे.

यामुळें प्रेमावर समाजाचा रोष झाला व गुप्त प्रेमसंबंधांतच प्रेमाची भूक शांत होण्याची शक्यता उरली.

यामुळें ज्या ठिकाणी अशा समाजांत विवाहबंध स्थिर केले गेले, त्या त्या ठिकाणीं त्यांचें जुळें भांवंड जें वेश्यावृत्ती, तिचा उदय झाला. पुढें पुढें तर वेश्या-व्यवसाय समाजाला अवश्य आहे असाच समज दृढ होऊं लागला. विवाहबंधही अवश्य होते, पण ते केवळ मालमत्तेकरतां. पत्नी ही पतीची मालमत्ता झाल्या-मुळें उत्कट भावनांची तृप्ति करावयास दुसऱ्याची पत्नी मिळणें दुरापास्त होतें, यामुळें वेश्यावृत्तीचा जन्म झाला. पुढे भांडवलशाहीच्या उगमानंतर वेश्यांच्या तनुविक्रयावर भांडवलवाले पैसा मिळवूं लागले......

वेश्याव्यवसाय व विवाहसंबंध यांच्या बुडाशीं असल्या प्रकारची आर्थिक परिस्थिति असतां, ती प्रथम नष्ट केल्यावांचून या दोन्ही संस्था कशा नष्ट होणार ? र.से.रू.च्या उपायाची भ्रामकता आपण जाणत नाहीं, याचें कारण लैंगिक स्वातंत्र्य आर्थिक स्वातंत्र्यानंतरच शक्य आहे याचा आपण विचार केला नाहीं. रसेलचें म्हणणें आहे कीं पतिपत्नींनी एकमेकांना व्यभिचाराचें पूर्ण स्वातंत्र्य दिलें कीं वेश्याव्यवसाय नष्ट होईल. म्हणजे एकून रसेल साहेबांचें म्हणणें असें दिसतें कीं पतिपत्नी एकमेकांना आपखुषीनें स्वातंत्र्य देतील. भांडवलवाल्यांनीं मजुरांना सर्व मजुरी दिली म्हणजे भांडवलशाहीचा प्रश्न सुटेल, इंग्रजांनी हिंदी लोकांना स्वातंत्र्य दिलें म्हणजे झालें; अगर सावकारानें कुळाला कर्जाची माफी केली म्हणजे संपलें; ह्या विधानांत व रसेल्च्या वरील विधानांत काय फरक आहे ? ज्याचे हातीं सत्ता आहे, त्याला निव्वळ हृदयबदल ( चेंज् ऑफ् हार्ट ) यासारख्या उपायांनी गांधीजीनी वळवण्याचा प्रयत्न करणें व रसेल्सारख्याने निवळ शिक्षणद्वारा आपला उपाय अंमलांत आणण्यास पतिपत्नींना सांगणें, यांत अत्यंत साम्य आहे. कारण विवाहसंबंधाच्या बुडाशीं असलेले आर्थिक घटक इतके बलवान आहेत कीं असल्या प्रकारचें स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न करणें म्हणजे समाजांत आमूलाग्र बदल घडवून आणण्याचें कार्य आहे. रसेलसाहेबांचें

मताने अशा प्रकारची सामाजिक क्रांति घडवून आणण्यास निवळ, शिक्षणच पुरे आहे असें दिसतें व हें त्यांचें मत त्यांच्या एकंदरींत संदेहवादी तत्वज्ञानाला व 'ॲनार्किक् रॅडिकॅलिझम्'ला धरूनच आहे. खरोखर, महात्मा गांधींच्या मनाला लैंगिक विषयांची जितकी कल्पना येणें शक्य आहे, तितकीच रसेलच्या मनाला वस्तुस्थितीचें नीट आकलन करण्याची शक्ति आहे! स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न व त्याबरोबरच आर्थिक समतेचा प्रश्न विचारांत न घेतां निवळ आभासात्मक लैंगिक स्वातंत्र्याच्या कल्पनेमागें लागलें, तर तें न मिळतां उलट प्रेम व सांस्कृतिक लैंगिक संबंध यांना बाजारांत आणून त्यांची किंमत मातीमोल करण्यासारखें होईल पतिपत्नी एकमेकांना पाहिजे असलेलें स्वातंत्र्य देणें शक्य नाही; उलट याचा परिणाम भयंकर होऊन प्रेम व लैंगिक संबंध या गोष्टी बाजारांत मिळूं लागतील (फुकट नव्हे!) व त्याचा फायदा श्रीमंत वर्ग घेणार! आम्ही तर असें म्हणतों की रसेलसाहेबांची घोषणा म्हणजे रसातळाला जात असलेल्या भांडवलदार वर्गाच्या ऐषआरामाविषयींच्या तहानेचें व घाणेरड्या विकृत लैंगिक भावनांचें द्योतक आहे. नाहींतर विवाहसंबंध अजिबात मोडण्याविषयी रसेलसाहेब आधीं बोलले असते व हल्लीच्याच समाजरचनेंत व विवाहसंबंधाच्या सांच्यांतच त्यांनी हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला नसता.

हल्ली रशियामधे समागमावर सामाजिक निर्बंध नाहींत म्हणून येथे वेश्यावृत्ति नष्ट झाली आहे, असें आपण म्हणतां. परंतु हें विसरतां की ते निर्बंध नष्ट करण्याची परिस्थिति सामाजिक क्रांतीनंतरच निर्माण झाली. आर्थिक स्वातंत्र्यानंतरच लैंगिक स्वातंत्र्याची शक्यता उत्पन्न झाली. रसेलसाहेब तर ह्या स्थितीत परिस्थितीकडे डोळेझांक करून व भांडवलशाही विवाहसंबंध कायम ठेवून लैंगिक स्वातंत्र्य मिळवूं पहातात. म्हणून त्यांनीं कितीही तत्वबोध करण्याचा आव आणला तरी तो निवळ भ्रमाचा भोपळाच ठरणार. रसेल्साहेब व त्यांचे अनुयायी हे डॉन क्विग्झोट व त्याचा सेवक सँको पांझा यांसारखेच हास्यास्पद झाले आहेत समतावाद्यांना लैंगिक स्वातंत्र्य नको आहे असें आपणांस वाटत असल्यास ती भ्रामक समजूत आहे. समतावाद्यांची लैंगिक स्वातंत्र्याची कल्पना रसेलच्या

कल्पनेपेक्षां सहस्रपटींनें श्रेष्ठ व शास्त्रशुद्ध आहे. त्यांना लैंगिक संबंधांना पाणी पिण्याच्या क्रियेच्या दर्जावर आणून बसवावयाचें नाहीं. लैंगिक संबंध पूर्णपणें प्रेमावरच बसले पाहिजेत व असल्या प्रकारच्या प्रेमाची शक्यता आज समाजांत मुळीच नाहीं असें त्यांचें स्पष्ट मत आहे. याकरता आजचा खरोखर महत्वाचा प्रश्न लैंगिक स्वातंत्र्याचा नसून, लैंगिक स्वातंत्र्य ज्यांत शक्य होईल अशी समाज-रचना उत्पन्न करण्याचा आहे. ही गोष्ट सामाजिक क्रांतीशिवाय अशक्य आहे.

समष्टिवादाचें आम्ही अवडंबर माजवलें आहे असें आपण म्हणतां. आम्हांला वाटतें कीं आम्ही प्रथमतः व्यक्तिदृष्टिकोणानें एकादा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला तर तो कसा हास्यास्पद ठरतो, हें दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. कोठल्याहि सामाजिक प्रश्नाकडे पहातांना सामाजिक दृष्टि ( ऑब्जेक्टिव्ह आउटलुक् ) व ऐतिहासिक भौतिकवादाची पद्धति ( हिस्टॉरिकल् मॅटीरिॲलिस्टिक मेथड ) यांचाच अवलंब केला पाहिजे. नाहीतर प्रो. पंडितांनी वेश्याव्यवसायाचे बाबतींत जे अजब शोध लावले आहेत, तसे शोध लागायचे; अगर रसेलसारखें केवळ कल्पनावातावरणांत दंग होऊन रहाण्याचा प्रसंग यावयाचा आणि प्रगति-विरोधी कृति बनावयाची !

दुसरा मुद्दा असा की ज्याअर्थी आपण व्यक्तिसमष्टिवाद उपस्थित केला आहे, त्याअर्थी आपणास व्यक्ति व समाज यांचे परस्पर संबंध कोणत्या प्रकारचे आहेत हें विचारावेंसें वाटतें. व्यक्तिस्वातंत्र्य आपणाप्रमाणें आम्हांलाहि पाहिजे आहे. फरक असा की आपण निर्भेळ स्वातंत्र्याच्या कल्पनावातावरणांत गिरक्या घालीत आहांत व आम्ही भूतलावर येऊन व्यक्तिस्वातंत्र्याची मर्यादा, शक्यता व तें मिळविण्याचे उपाय, यांचा विचार करतों. आपला पक्ष स्वातंत्र्यवादी आहे असें आपण लिहितां; स्वातंत्र्याची आपली कल्पना काय आहे तें कळत नाही. व्यक्ति ही समाजाचा घटक असते व त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याच्या मर्यादा समाजाच्या भौतिक परिस्थितीवर अवलंबून असतात. पुन्हां, व्यक्तींचें स्वातंत्र्य कितपत असावें हें त्याच्या आर्थिक व भौतिक परिस्थितीने ठरवलें जातें. आजच्या समाजांत

व्यक्तिस्वातंत्र्य आहे असें आपणांस वाटतें काय ? भौतिक परिस्थितीने बांध गेलेल्या सामाजिक व्यक्तीने व्यक्तिस्वातंत्र्याची 'ॲनार्किक' कल्पना करुन घे अशास्त्र आहे. वास्तविकपणें तत्वज्ञानदृष्टया स्वातंत्र्याचा अर्थ 'वाटेल तें करणे असा नसून, 'जरूरीचें कार्य ओळखणें व त्याप्रमाणें वागणें' म्हणजेच स्वातंत्र्य अ आहे. ( फ्रीडम् ऑफ् विल् इज् दी रेकॉग्निशन् आफ् नेसेसिटी ) त्यामुळें व्यक्ति स्वातंत्र जर वाढवावयाचें असेल, तर ज्यांत व्यक्तीला जास्त स्वातंत्र्य मिळण्याची शक्यता येईल अशी समाजरचना निर्माण करणें होय. आपण म्हणतां कीं जे समाजहिताचा प्रश्न उद्भवत नाहीं, तेथें व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावें व सम जानें व्यक्तीला दडपून टाकूं नये. आज अशी एकतरी महत्वाची गोष्ट आहे काय की जेथें समाजाचा प्रश्न येत नाहीं ? समागमाचा प्रश्न देखील सामाजिक आहे म्हणून समाजरचनाच अशी करणें आवश्यक आहे कीं त्यांत व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य मिळेल. समाजसत्तावादी समाज हा एकच असला समाज आहे त्याकरता जर लढावयाचें असेल तर व्यक्तिस्वातंत्र्याची निवळ भ्रामक कल्पना उराशीं न बाळगतां समष्टिवादी दृष्टिकोणानेंच खऱ्या व्यक्तिस्वातंत्र्याकरतां प्रत्येक घटनेचें मोजमाप केलें पाहिजे.

आपणां सर्वांनाही लैंगिक स्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य पाहिजे आहे. फरक एवढाच कीं तुमच्या मार्गानें ते मिळणें कधींही शक्य नाहीं. यासंबंधी आणखी कांहीं प्रश्न निघाल्यास आम्हीं चर्चा करावयास तयार आहोंत.

आपले पु. रं. टोणगांवकर, बी. ई.

विद्याधर देवधर, बी. ई.

---

# शारदेचें पत्र

## ( पत्रास उत्तर )

आपणांस पारंपरिक नीति मान्य नाहीं हें पाहून आनंद होतो आणि त्या बाबतींत जास्त लिहिण्याचें कारणच उरत नाहीं. आपल्या पत्रांतील बाकीचा मज

कुर आपल्या घमेंडखोरपणाचा द्योतक आहे. थोड्याबहुत प्रमाणांत घमेंड देखील मी क्षम्य मानतें, परंतु आपणांत तिचा अतिरेक आहे असें माझें मत आहे. कामविषयक स्वातंत्र्य मिळण्यास किंवा वेश्यावृत्ति नाहीशी होण्यास भांडवलशाही नष्ट झाली पाहिजे, या आपल्या म्हणण्याला काडीइतका आधार नाही. रशियांत तशी स्थिति झाली, परंतु एक गोष्ट दुसरीमागून झाली म्हणजे दुसरी गोष्ट पहिलीचा परिणामच असली पाहिजे असें मात्र होत नाही, आणि आपल्या म्हणण्याविरुद्ध अनेक पुरावे दाखवतां येतील. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील ' वायोमिंग " संस्थानांत कायद्याच्या दृष्टीने स्त्री–पुरुषांची समता स्थापित झाल्याबरोबर थोड्याच कालांत तेथे वेश्यावृत्ति नाहींशी झाली. सामान्यतः पुरुषी अंमलांत पुरुषांचा दर्जा जास्त असल्यामुळे त्यांना वेश्यावृत्ति करण्यांत कमीपणा वाटतो, त्याचप्रमाणे जेव्हा कित्येक ठिकाणीं स्त्रियांचें पुरुषांवर वर्चस्व होतें, त्या वेळीं स्त्रियांना वेश्यावृत्तींत कमीपणा वाटत असे, आणि पुरुष मात्र समागमाबद्दल मोबदला घेत असत. त्याचप्रमाणे समतेच्या राज्यांत दोघांसहि त्यांत कमीपणा वाटतो.

विवाहबंधनाविषयीं पाहिलें तर तेथेंहि आपलें म्हणणें खरें नाही. तें किती कडक किंवा शिथिल असावें, हा केवळ रूढीचा प्रश्न असतो आणि भांडवलशाही नाहींशी झाल्याशिवायहि त्यांत पुष्कळ फरक होऊं शकतो. मार्क्सचें वेड लागलेल्या लोकांना तो दिसत नाही इतकेंच. उदाहरणार्थ हिंदुस्थान, इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या सर्व ठिकाणीं भांडवलशाही आहे, पण विवाहबंधनांत मात्र पुष्कळ फरक आहे. इंग्लंडांत विवाहापूर्वी मुलींना पुष्कळच स्वातंत्र्य असतें, परंतु तें विवाहानंतर कमी होतें; फ्रान्समध्ये विवाहापूर्वी मुलींनी कोठेंही एकटें जायचें नाही असा कडक नियम गेल्या युद्धापूर्वी असे आणि विवाहानंतर मात्र त्यांना भरपूर स्वातंत्र्य मिळत असे; आणि यामुळे त्या विवाह हा स्वातंत्र्याचा मार्ग समजत असत. हल्लीं मुलींना विवाहापूर्वी देखील बरेंच स्वातंत्र्य मिळतें आणि विवाहोत्तर स्थिति होती तशीच राहिली आहे. स्त्रीच्या व्यभिचाराचा बभ्रा न झाल्यास फ्रेंच नवरा तिकडे काणा डोळा करतो. अमेरिकेंत विवाहापूर्वी मुली वाटेल तें करतात, कारण त्यांना नोकरी करून आपलें पोट सहज भरतां येतें

आणि त्यांच्या 'नैतिक' वागणुकीचा त्यांत प्रश्न येत नाही; आणि विवाहानंतर घटस्फोटही बऱ्याच संस्थानांत सोपा झाल्यामुळें विवाहबंधनाचा फारसा जाच होऊं शकत नाही. हिंदुस्थानांतील स्थिति सांगण्याचें कारण नाही. यावरून आपलें म्हणणें किती फोल आहे हें सहज दिसतें.

रसेल्ला मूर्ख म्हटल्याने त्याचें कांहीच न बिघडतां आपणास मात्र लोक मूर्ख समजतील. केवळ आग्रहाच्या ( कांही लोक सत्याग्रह म्हणतील, कांही दुराग्रह म्हणतील, मी केवळ आग्रहच म्हणतें ) जोरावर पुढे आलेल्या गांधीजींची आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर आणि विशद विचारसरणीच्या आधाराने जगांतील प्रमुख विचारवंतांत गणना करून घेणाऱ्या रसेलची आपण तुलना करून त्यांत साम्य आहे म्हणतां, यांत आपण आपलें हंसें करून घेत आहांत. आपणांस रसेलपेक्षा जास्त अक्कल असल्याची घमेंड आहे; मग ती अक्कल आपल्या लेखांत अदृश्य कशी झाली ? रसेल्च्या मनाला वस्तुस्थिति कळत नाही आणि आपणांस कळते, हा आपला भ्रम आहे. रसेलचें म्हणणेंच आपणांस कळलेलें नाही, आणि आपल्या लेखावरून असें स्पष्ट दिसतें की रसेलचे लेख आपण स्वतः न वाचतां त्याला कोणीतरी दिलेल्या शिव्या मात्र वाचून त्यांचा पुनरुच्चार करीत आहांत: एरवी इतकीं हास्यास्पद विधानें आपण केली नसतीं असें मी धरून चालतें. अतिथीला स्त्री अर्पण करण्याची चाल इतर कांही देशाप्रमाणे हिंदुस्थानांतही कांही काल होती आणि त्या वेळींही स्त्री ही पतीची मालमत्ताच असे आणि म्हणूनच ती अशा तऱ्हेने दुसऱ्याला वापरूं देता येत असे. हा केवळ रूढीचा प्रश्न आहे. विवाहबंधन कडक ठेवण्याचा हेतु इतकाच असतो की ज्यांना आपली मालमत्ता मरणोत्तर मिळणार, तीं आपलींच मुलें असवीं अशी खात्री पतीला पाहिजे असते; आणि व्यभिचाराला परवानगी दिल्यास तशी खात्री रहात नाही. असें असून सुद्धा वरील चाल पूर्वी हिंदुस्थानांत होती आणि ग्रीस देशांत तर मुलें सुंदर व सुदृढ व्हावीं म्हणून पति आपण होऊनच एखाद्या बांधेसूद पुरुषाला बोलावून त्याचेकडून प्रजोत्पत्ति करवीत असत. आपणाकडील नियोगाची चाल देखील हेंच दर्शवते की

पति समजून उमजून देखील व्यभिचाराची परवानगी देऊं शकतो. शिवाय रसेल्चें म्हणणें वेगळेंच आहे. कडक बंधनाचा उपयोग पतीच्या दृष्टीने केवळ वारसापुरताच आहे, तेव्हा ती अडचण काढून टाकल्यास व्यभिचारास पतीची हरकत राहण्याचें कारण नाही; आणि हल्ली संततिनियमनाच्या साधनांनी ही अडचण नाहीशी झालेली आहे; तेव्हा रसेल असें म्हणतो की इतरांपासून मुलें होऊं न देण्याची खबरदारी पत्नीने घ्यावी. अर्थात् ती घेणें न घेणें तिच्यावर राहील, पण हल्ली देखील व्यभिचार करणें न करणें तिच्या मर्जीवरच असतें! हल्ली व्यभिचार न करण्यासंबंधी बंधन ज्या स्त्रिया पाळतात त्यांना संततीसंबंधीहि काळजी घेतां येईल.

आपणांस पारंपरिक नीति मान्य नाही असें आपण म्हणतां खरें, पण आपणावर परंपरेचा अजून चांगलाच पगडा आहे हें आपल्या घाबरट उद्गारांवरून स्पष्ट दिसतें. 'याचा परिणाम भयंकर होऊन प्रेम व लैंगिक संबंध या गोष्टी बाजारांत मिळूं लागतील (फुकट नव्हे!) व त्याचा फायदा श्रीमंत वर्ग घेणार!' या शब्दांचा अर्थ काय? आपण घाबरलांत हें दिसतेंच, कारण 'बाजारांत' म्हटल्यानंतर 'फुकट नव्हे' असें म्हणण्याचें कारण नव्हतें. खरें प्रेम बाजारांत मिळणें अशक्य आहे. बनावट प्रेम आणि लैंगिक संबंध बाजारांत मिळतील म्हणण्यांत काय अर्थ आहे? तीं हल्ली मिळत नाहीत काय, आणि श्रीमंत लोक त्याचा फायदा घेत नाहीत काय? घाणेरड्या, विकृत, लैंगिक भावना केवळ आपल्या डोक्यांतच आहेत, त्या रसेलच्या घोषणेंत कोठेच नाहीत. पतिपत्नींनी समंजसपणें वागावें व व्यभिचारासारख्या क्षुल्लक बाबींकरता घटस्फोट मागूं नये आणि तो त्याकरता मिळूं नये, असें त्यांचें म्हणणें आहे. विवाहसंबंध अजीबात मोडण्याविषयी रसेल्ने लिहिलें नाही याचें कारण इतकेंच की मुलांच्या संगोपनाच्या दृष्टीने मुलांना आईबापांची संगत शक्य तितकी लाभावी असें त्यांचें मत आहे. याला आपण विकृत भावना म्हणत असल्यास आपल्याच भावनांना कांहीतरी रोग झालेला असला पाहिजे. आर्थिक स्वातंत्र्याशिवायहि रूढीने कामविषयक स्वातंत्र्य

मिळूं शकतें हें वर पाहिलेंच. परंतु तें आर्थिक स्वातंत्र्यानेच मिळेल असें धरून चाललें तरीहि त्याला भांडवलशाही नष्ट झाली पाहिजे असे नाही. ज्यांना आज आर्थिक स्वातंत्र्य असेल त्यांनी कामविषयक स्वातंत्र्य ताबडतोब घेण्यास काय हरकत आहे ? अर्थात् पुरुषावलंबी स्त्रियांना पतीचे मर्जीविरुद्ध तें मिळणार नाही, हें मीही अनेक वेळां लिहिलें आहे आणि हा शोध समतावाद्यांनी लावलेला नाही. मी स्वतः समतावादाचे विरुद्ध नाही. फक्त समतावाद्यांचे हेकेखोरपणाचे विरुद्ध आहें. राज्यक्रांति होईपर्यंत इतर कोणतीही सुधारणा करतां येणार नाही किंवा करतां नये, हें समंजस माणसांना कबूल होणार नाही. अशा हटवादीपणामुळेच समतावादी संततिनियमनाच्याहि विरुद्ध बोलतांना आढळतात. वस्तुतः समतावादाचा त्यांत संबंधच येत नाही आणि सोव्हिएट् राज्यांत संततिनियमनाचा प्रचार करतात; येथे मात्र पुष्कळ समतावाद्यांना त्याचें महत्व कळत नाही किंवा ते न कळल्याचें ढोंग करतात रसेल्च्या कल्पनाच ज्यांना समजत नाहीत, त्यांनी स्वतःची लैंगिक स्वातंत्र्याची कल्पना रसेलच्या कल्पनेपेक्षा सहस्रपटीने श्रेष्ठ आहे म्हणण्यांत काय अर्थ आहे ? ' लैंगिक संबंध आम्हाला पाणी पिण्याच्या क्रियेच्या दर्जावर आणून बसवावयाचे नाहीत !' हें तुम्ही कोण शिष्ट ठरवणार ? हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. तुम्ही ज्याला उत्कट प्रेम म्हणतां तें सर्वांनाच शक्य नसतें, हेंही तुम्हांला कळावें. या बाबतींत कोणाला हुकूम सोडण्याचा अधिकार तुम्हाला नाही. त्याचें महत्व ज्याला जितकें वाटेल तितकें तो मानील आणि तसें मानण्याचेंच स्वातंत्र्य व्यक्तीला असलें पाहिजे.

रसेल्पेक्षा अधिक ज्ञानाची व अकलेची जे घमेंड मारतात, त्यांना ' ऑब्जेक्टिव्ह आउट्लुक् ' याचाही अर्थ कळूं नये ? याचा अर्थ ' सामाजिक दृष्टि ' असा बिलकूल होत नाही. जो शास्त्रीय विचारसरणीचा पाया समजतात, त्याचाच अर्थ आपणास माहित नाही आणि तरी देखील घमेंड आहेच ! वर जें मीं सांगितलें की उत्कट प्रेम प्रत्येक व्यक्तीला शक्य नसतें, हें विधान सामाजिक दृष्टीने केलेलें नाही, परंतु तें ऑब्जेक्टिव्ह आउट्लुक्ने केलेलें आहे. या शब्दप्रयोगाचा अर्थ ' बहिर्मुख दृष्टि ' म्हणजे स्वतःच्या भावना शक्य तितक्या बाजूला ठेवून केवळ बहिःसृष्टीचें

अवलोकन करण्याची पद्धत. रसेल् तत्वज्ञानाचा आव आणतो असें म्हणणारांना साध्या शब्दांचे अर्थ देखील कळूं नयेत काय ? आपली तत्वज्ञानदृष्ट्या स्वातंत्र्याची व्याख्या अत्यंत हास्यास्पद आहे. जरूरीप्रमाणे मनुष्य नेहमीच वागत असतो, नव्हे सर्वांना वागावें लागतें. तेव्हा आपल्या व्याख्येप्रमाणे गुलामही स्वतंत्रच असतात म्हणायचे ! समागम ही एका काळीं सामाजिक बाब होती, परंतु ज्यांना संततिनियमनाची आणि रोगप्रतिबंधाची माहिती आहे अशा सुशिक्षितांचे बाबतात तरी ती हल्ली सामाजिक बाब नाही. आणि यामुळेच पुढारलेले लेखक या बाबतात व्यक्तिस्वातंत्र्य मागतात. यांत ' ॲनार्किक् ' असें कांहीच नाही, समाजाने नसत्या उठाठेवी करूं नये इतकेंच माझें म्हणणें आहे सर्वांस तसें स्वातंत्र्य केव्हा मिळेल तेव्हा मिळो, ज्यांना तें आज घेतां येईल त्यांनी तें आज, आत्तां, घ्यावें, क्रांतीची वाट पहाणें मूर्खपणा आहे.

**शारदा**

---

# व्यायाम–१९

**४४.** ताठ उभे राहून, हात दोन्ही बाजूला वर उचलून खांद्याच्या रेषेंत आणा. नंतर (१) डावा पाय ताठ ठेवून डाव्या बाजूला शक्य तितका वर उचला. तो जवळजवळ आडवा झाला पाहिजे आणि बिलकुल पुढे किंवा मागे जातां नये. उजव्या पायापासून डोक्यापर्यंत नेहमींचा पांच बिंदूंचा नियम लागू राहील. तोल संभाळण्याकरता सर्व शरीर किंचित् उजव्या बाजूला वांकेल (२) पांचसहा सेकंदपर्यंत तसेच रहा, आणि (३) पाय सावकाश खाली आणा तसेंच उजव्या पायाने करा.




**( आकृति नं. ३९ )**



३

प्रत्येक बाजूला ३ वेळां पुरे. आरंभींच पाय पुरा आडवा होणार नाही, त्याचा कोण ४५° पासून हळूहळू वाढत ९०° पर्यंत गेला तरी हरकत नाही ( आकृति ३९ ) यांत पुढील चुका होण्याचा संभव आहे. पाय उचलणें सोपें व्हावें म्हणून कदाचित् धड उजव्या बाजूला वांकेल, कदाचित् उचललेला पाय आणि धड ही दोन्ही पुढे वांकतील, कदाचित् पाय वाटोळा फिरून टांच जमिनीकडे होईल. पाऊल शक्य तितकें पायाच्या रेषेंत आलें पाहिजे आणि टांच मागच्या बाजूलाच राहिली पाहिजे. कदाचित् जमिनीवरील पायाचा गुडघा वांकेल.

**४२.** कमरेवर हात ठेवून ताठ उभे रहा. नंतर ( १ ) डावा पाय शक्य तितका मागे उचला. गुडघा ताठ राहिला पाहिजे, पाऊल लांब झालें पाहिजे. पाय कितीहि मागे उचलला तरी ४५° डिग्रीपेक्षा जास्त कोन करणें अशक्य होईल डावा पाय सोडल्यास नेहमीचे पांच बिंदु एका फळींत असले पाहिजेत, परंतु तोल रहाण्याकरता सर्व शरीर किंचित् पुढें वांकेल. ( २ ) वर उचललेला पाय पांचसहा सेकंद तसाच ठेवा. ( ३ ) सावकाश परत आणा. असें प्रत्येक पायानें ३ वेळां करा. पुढील चुकांकडे लक्ष द्या. पाय वर उचलतांना धड पुढें जातां नये. तें गेल्यास ढुंगणाच्या स्नायूंस व्यायाम होणार नाही. गुडघा वांकतां नये, पाऊल शक्य तितकें पायाच्या रेषेंत झालें पाहिजे. ( आकृति ४० )



**(आकृति नं. ४०)**

---

**केळीं खा.** केळें हा एक शरीराला उत्कृष्ट पोषक आणि पचायला सोपा असा पदार्थ आहे हें किती लोकांस माहीत असेल ? शंभर ग्रॅम् ( अजमासें साडे-तीन तोळे ) वजनाच्या केळ्यापासून शरीराला १०० कॅलोरी इतकी उष्णता मिळते, म्हणजे तितक्याच वजनाच्या मांसाइतकीच पोषक शक्ति केळ्यांत असते.

हें लक्षांत घेतल्यास याची कांहीशी कल्पना येईल. तितक्याच वजनाचीं सुकी केळीं घेतल्यास त्यांतून २८५ कॅलोरी उष्णता मिळते. शरीरास लागणारे सर्व वेगवेगळे पदार्थ त्यांत असून व्हिटॅमीन् पैकी ए, बी, सी, हींहि असतात, डी मात्र नसतें. केळीं व दूध मिळून मोठ्या मनुष्याला संपूर्ण अन्न होऊं शकतें. हाडकुळ्या मुलांस यांचा अतिशय उपयोग होतो आणि कांही दिवस केवळ केळीं व दूध एवढाच आहार ठेवल्यास शरारांतील विषार नाहीसे होतात. आहाराचे मानाने दररोज १५ पर्यंत केळीं व एक लीतर ( ३५ औंस ) दूध घ्यावें लागतें. असें केल्यास विश्रांति घेण्याची जरूर न पडतां मनुष्य आपलें नेहमीचें काम करूं शकतो. कांही आंतड्यांच्या व फुप्फुसांच्या विकारांवरही केळ्यांचा उपयोग होतो. यांतील ए व्हिटॅमीन्‌चा उपयोग इन्फ्लुएन्झासारखा रोगांचा प्रतिबंध करण्याकडेहि होतो. केळीं खावयाचीं तीं पुरी पिकलेलीं मात्र असावीं, कच्चीं असल्यास पचन तितकें चांगलें होत नाही.

---

**मलेरियावर एक उपाय.** जवळपास इतर प्राणि असल्यास मलेरियाचे डांस माणसांपेक्षा त्यांसच अधिक चावतात असा अनुभव आहे. अर्थात् मलेरियाच्या डांसांत अनेक जाती आहेत आणि त्या सर्वांची आवडनिवड सारखी नसते. यामुळे ज्या भागांत हा उपाय करायचा असेल, तेथील डांसांच्या संवयी पाहून त्याप्रमाणे वेगवेगळे प्राणि पाळावे लागतील. अशा तऱ्हेनें इटलीमध्ये आ र्डि आ नांवाच्या ७०० लोकसंख्येच्या गांवांत प्रयोग करून पाहिले. पूर्वी सर्व उपाय करून पाहून देखील १९२९ सालीं शेंकडा २३, १९३० सालीं शेंकडा ४६, व १९३१ सालीं शेंकडा ३२ लोक मलेरियाने आजारी होते. नंतर डुकरें पाळून पाहण्याचें ठरवून वीस डुकरखाने बांधून तेथें डुकरें ठेवलीं. हें केल्यावर १९३२ सालीं या डुकरखान्यांत १९६७८ डांस पकडले आणि गांवांतील घरांत फक्त २५६८ च सांपडले. रोग्यांची संख्या शेंकडा ९ वर आली. १९३१ सालीं १६ नवीन लोक मलेरि-

याने लागले होते, परंतु १९३२ सालीं फक्त एकच आणि तेंही एक ९ महि-न्यांचें मूल नवीन लागलें. आता डुकरखाने वाढवण्याचें ठरवलें. आतांपर्यंत २० डुकरखाने मिळून ३९ डुकरें होतीं, म्हणजे त्यांचें लोकसंख्येशी प्रमाण १८ माणसांस एक डुकर असें होतें. डुकरांची संख्या आणखी वाढव-ल्यावर १९३३ सालीं डुकरखान्यांत २४९६१ डांस सांपडले आणि गांवां-तील घरांत फक्त ६२८ सांपडले. रोग्यांची संख्या शेंकडा ७ वर आली आणि त्या वर्षी झालेल्या १८ मुलांपैकी एकासही रोग झाला नाही. १९३३ सालीं प्रत्येकास प्रतिबंधाकरता कोयनेल देण्याचें बंद केलें होतें. यामुळे या पद्ध-तीचा उपयोग कोयनेलापेक्षा जास्त होतो आणि खर्च कितीतरी कमी येतो हे उघड झालें. अशा तऱ्हेने जे प्राणि पाळायचे ते सहज मिळण्यासारखे असले पाहिजेत आणि ते पाळणारांस फायदा झाला पाहिजे. असे प्राणि म्हणजे डुकरें, घोडे, गुरें, ससे वगैरे होत आणि सर्व जगभर यांतील कांही प्राणि तरी सांपडता-तच. असे प्राणि पाळल्याबरोबर डांस माणसांऐवजी त्यांना चावू लागतात. मात्र ते प्राणि त्यांना आवडले पाहिजेत. यासंबंधी प्रयोग जाग्यावरच केले पाहिजेत, ते रसायनशाळेंत होणार नाहीत.

---

**तोंडाची घाण.** कांदा, लसूण खाल्ल्यावर तोंडाला जी घाण येते तीवर आजपर्यंत चांगलासा उपाय सांपडला नव्हता. परंतु आतां दोन अमेरिकन डॉक्ट-रांनी यासंबंधी अनेक प्रयोग करून असा शोध लावला आहे कीं साबणानें किंवा 'अल्कॉहॉल 'ने देखील न जाणारा हा वास 'क्लोरॅमीन ' नांवाच्या औषधानें जातो. याच्या वड्या मिळतात, त्यांतील १ पाण्यांत टाकून त्याने दांत, जीभ व तोंड साफ धुतल्यास वास ताबडतोब जातो. इतर कारणांनी येणारा वास देखील याने नाहासी होण्याचा संभव आहे. अपचनाने येत असल्यास मात्र जाणार नाही.

---